एका शोकेसमधून सुरू झालेला जपानचा प्रवास

खूप लहानपणापासून मलाही सर्वांसारखंच बाहुल्यांचं वेड होतं…

आज्जीच्या घरात एक जुनी, काचेची शोकेस होती. त्या शोकेसमध्ये जपानी सात बाहुल्या नीट रांगेत उभ्या होत्या. त्या बाबांनी जपानहून आणलेल्या आणि त्यामुळेच कदाचित त्या घरातल्या इतर सगळ्या वस्तूंहून वेगळ्या वाटायच्या.

त्या बाहुल्या आमच्याच होत्या , पण मी त्यांना हात लावू शकत नव्हते.... शोकेस मधली मौल्यवान वस्तू होती त्या ९० च्या दशकात ..... आपल्याकडे नसलेली ch गोष्ट आपल्या आकर्षित करते ना तसेच काहीतरी 😍😍 कदाचित म्हणूनच त्यांच्याकडे ओढ जास्त होती. दररोज मी त्या शोकेससमोर थांबायचे. स्पर्श नाही, हट्ट नाही फक्त पाहणं. त्या शांत उभ्या असायच्या… आणि मला नेहमी वाटायचं, त्या काहीतरी सांगायचा प्रयत्न करत आहेत. जसं एखादं दूरचं जग मला हळूच हाक देत आहे. तिथूनच कदाचित जपान माझ्या मनात घर करून बसला. वर्षं गेली. मी मोठी झाले. प्रवास माझा व्यवसाय झाला. आणि आयुष्य मला पुन्हा पुन्हा जपानकडे घेऊन गेलं.

आज मी जपानला ५ _ ६ वेळा भेट दिली आहे. पण गंमत सांगू? प्रत्येक वेळी मी तिथे गेल्यावर त्या बाहुल्यांनाच शोधते. तोच उत्साह. तेच कुतूहल. तोच लहानपणीचा ओढा.

जपान फक्त देश नाही तो एक शिस्तीचा अनुभव आहे. रस्ते बोलत नाहीत, लोक ओरडत नाहीत, पण सगळं काही स्पष्ट सांगतं. वेळेचं भान, कामातली प्रामाणिकता, आणि समोरच्याबद्दलचा आदर हे तिथे शिकवलं जात नाही, जगलं जातं.

कधीकधी मला India ची आठवण होते. आपणही पाहुण्याला देव मानतो. आणि जपानमध्ये? प्रत्येक रेस्टॉरंटमधले शेफ, वेटर,सगळे आमच्या बसजवळ सोडायला यायचे आणि निघताना वाकून नमस्कार करायचे.🙇🙇 कोणताही दिखावा नाही. फक्त मनापासूनचा आदर.🙏🙏like अतिथी देवो भव!!

आणि मग येतं जपानी गिब्ली आर्ट 👩‍🎨👨‍🎨 अगदी वेगळ्याच जगात घेऊन जाणारं.... त्याच्यावर पण मी लिहीनच एकदा ...🪄

गिब्ली म्हणजे फक्त अॅनिमेशन नाही. ते भावना आहे. निसर्गाशी संवाद आहे. लहान गोष्टींमध्ये मोठं सौंदर्य शोधायची कला आहे. त्यांच्या कलाकृती बघताना असं वाटत... जग खूप वेगात चाललं असलं, तरी कुठेतरी थांबणं अजूनही शक्य आहे.

जपान मला प्रत्येक वेळी नवीन काहीतरी शिकवतो. पण तरीही त्या सात बाहुल्या…

त्या अजूनही माझ्या आतल्या लहान मुलीला जागृत करत असतात. मी खूप फिरले आहे. खूप देश पाहिले आहेत. पण काही देश पाहिले जात नाहीत ते मनात साठवले जातात. जपान तसाच आहे. आणि हो… थोडं चहाचे-गुपित अजून बाकी आहे 😉 ते मी सांगेन… पुन्हा कधी, जेव्हा हातात पेन येईल. तोपर्यंत curiosity जपून ठेवा ✨#JapanDiaries #TravelStories #WomenWhoTravel #JapanCulture #TravelWithSoul #IndianTraveller #SujataDahad